गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ३२७ वा ● बुधवार १७ एप्रिल २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 327 | Date : 17/04/2024 blow Wednesday Page 4 Price 4

## यंदा उत्तम पावसाचा अंदाज

### १०६ टक्के पाऊस पडण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने व्यक्त केला



पुणे : यंदा नैऋत्य मोसमी पावसाच्या दमदार सरी बरसणार आहेत. एक जून ते ३० सप्टेंबर, या पावसाळ्याच्या चार महिन्यांत देशात सरासरीपेक्षा जास्त म्हणजे १०६ टक्के पाऊस पडण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. ते म्हणाले की, जगभरातील स्थिती मोसमी पावसाला पोषक आहे. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यात नैऋत्य मोसमी पाऊस सरासरीपेक्षा जास्त, १०६ टक्के पडण्याचा अंदाज आहे. प्रशांत महासागरात सध्या एल-निनो सक्रिय असून, तो मध्यम अवस्थेत आहे. जूनच्या सुरुवातीपर्यंत एल-निनो निष्क्रिय स्थितीत जाईल आणि ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये ला-निना सक्रिय होईल. हिंद महासागर द्विध्रुविता (इंडियन ओशन डायपोल, आयओडी) सध्या निष्क्रिय आहे, तो जूनच्या सुरुवातीस सक्रिय होईल. युरोशियातील (युरोप आणि आशिया) बर्फाच्छादित क्षेत्र मार्च-एप्रिलमध्ये सरासरीपेक्षा कमी राहिले, ही सर्व स्थिती नैऋत्य मोसमी पावसासाठी पोषक आहे. त्यामुळे सरासरीपेक्षा जास्त पावसाची शक्यता आहे.

मोसमी पावसाच्या मुख्य क्षेत्रासह म्हणजे मध्य भारतासह । पान २ वर

**यंदा नैऋत्य मोसमी पाऊस सरासरीपेक्षा जास्त, १०६ टक्के पडण्याचा अंदाज आहे. मे अखेरीस सुधारित अंदाज जाहीर केला जाईल. त्यावेळी महिनानिहाय पावसाच्या अंदाजासह देशातील मोसमी पावसाच्या प्रगतीचा अंदाजही जाहीर केला जाईल.- डॉ. मृत्युंजय महापात्रा, महासंचालक भारतीय हवामान विभाग**

## शक्तिप्रदर्शन करीत सोलापूर व माढ्यासाठी भाजपचे उमेदवारी अर्ज दाखल..

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूर लोकसभेसाठी राम सातपुते आणि माढा लोकसभेसाठी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर या दोन्ही भाजपच्या उमेदवारांनी मंगळवारी दुपारी रणरणत्या उन्हात मोठे शक्तिप्रदर्शन करीत अर्ज दाखल केले. यानिमित्ताने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापुरात येऊन दोन्ही उमेदवारांना बळ दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सामान्य जनतेचा आशीर्वाद असल्यामुळे त्यांचे कोणी वाकडे करू शकत नाही, असा दावा फडणवीस यांनी केला.सोलापूरच्या तापमानाचा पारा चाळिशीच्या पुढे कायम असताना दुपारच्या तप्त उन्हात जुना पुणे चौत्रा नाक्यावरील छत्रफती संभाजी



महाराज पुतळ्यापासून सोलापूर लोकसभेचे भाजपचे उमेदवार राम सातपुते यांची विजय संकल्प यात्रा निघाली. नंतर त्यात माढा लोकसभेचे उमेदवार रणजितसिंह नाईक-निंबाळकर दाखल झाले. तळपत्या उन्हाची पर्वा न करता हजारो कार्यकर्ते या विजय संकल्प यात्रेत सहभागी झाले होते. पंतप्रधान मोदींचे मुखवटे घालून कार्यकर्ते भाजप व महायुतीच्या जयजयकारासह 'जय श्रीराम' चे नारे लावत होते. हलग्यांचा कडकडाट करीत निघालेल्या या । पान २ वर

## प्रभू रामाच्या मूर्तीवर दुग्धाभिषेक! अयोध्येतल्या मंदिरातील रामलल्लाचं मूळ रुप दर्शन

नवी दिल्ली : यंदाची रामनवमी अत्यंत खास आहे. कारण, गेल्या ५०० वर्षांचा वनवास संपून भगवान राम अयोध्येच्या मंदिरात २२ जानेवारी रोजी विराजमान झाला. त्यामुळे हा दिवस रामभक्तांसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातोय. आज रामनवमी निमित्त रामावर दुग्धाभिषेक करण्यात आला.



१७ एप्रिलच्या रामनवमीचा उत्साह देशभरात शिगेला पोहोचलेला आहे. राम मंदिर निर्मितीनंतर साजरा होणारा हा पहिलाच जन्मोत्सव असल्याने लाखोंच्या संख्येनं भाविकांच्या गर्दीची शक्यता आहे. याच पार्श्र्वभूमीवर रामनवमी संदर्भात श्रीराम मंदिर ट्रस्टने मार्गदर्शक सूचना जारी केल्या असून १५ ते १८ एप्रिलपर्यंत व्हीआयपी दर्शनावर पूर्ण बंदी घालण्यात आली आहे. याशिवाय रामनवमीला भाविकांना इतर अनेक गोष्टींची काळजी घ्यावी लागणार आहे. ज्या भाविकांनी १५ ते १८ एप्रिल दरम्यान ऑनलाइन पाससाठी अर्ज केले होते, ते सर्व पासही रद्द करण्यात आले आहेत. राम मंदिर ट्रस्टच्या । पान २ वर

## भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई सुरूच ठेवणार; बिहारमधील सभेत पंतप्रधानांची ग्वाही

पुर्णिया/गया : पुन्हा सत्तेत आल्यास आमचे सरकार घुसखोर थांबवेल तसेच भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई सुरूच ठेवेल अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली. मतपेढीच्या राजकारणामुळे घुसखोरी वाढल्याचा आरोप त्यांनी केला.

बिहारमधील पुर्णिया येथील सभेत घुसखोरांचा मुद्दा पंतप्रधानांनी उपस्थित केला. नेपाळ तसेच बांगलादेश सीमेनजीक हा मतदारसंघ आहे. मोदींना कोणी रोखू शकणार नाही हे सुधारित नागरिकत्व कायद्याला विरोध करणाऱ्यांनी ध्यानात घ्यावे असा इशाराच त्यांनी दिला. गया येथील सभेत त्यांनी राज्यघटनेचा संदर्भ देत वंचितांच्या वेदना मला समजतात. घटनेमुळेच माझ्यासारखी । पान २ वर




### सदिच्छा भेट...



सोलापूर येथे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेश अध्यक्ष मा. वसंतराव मुंडे यांचे अक्कलकोट तालुकाध्यक्ष कमलाकर सोनकांबळे यांनी दैनिक सुराज्य कार्यालय येथे भेट घेऊन दैनिक यश सिध्दी न्युज दिवाळी अंक भेट देण्यात आले , यावेळी भाजपा अनुसूचित जाती सेल तालुकाध्यक्ष निजप्पा गायकवाड उपस्थित होते

## नागणसूर मध्ये अखेर वेशी मधून निघाले डॉ बाबासाहेब आंबेडकर मिरवणूक, जातीवादी लोकांनी टायर जाळून तणाव निर्माण करण्याचे प्रयत्न, पोलिसांच्या मध्यस्थीने प्रकरण शांत

### सदर प्रकरणातील जातीवादी लोकाविरोध अनु. जाती जमाती आयोगाकडे भीम सैनिक करणार तक्रार





अक्कलकोट /प्रतिनीधी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी केल्यामुळे अक्कलकोट तालुक्यातील नागणसूर या गावात वाद झाल्याने दलित-सवर्ण संघर्ष वाढत असताना पोलिसांच्या मध्यस्थीने प्रकरण शांत झाले .जगभरात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३व्या जयंती मोठ्या उत्साहात साजरा होत असताना अक्कलकोट तालुक्यातील नागणसूर गावात काही गाव गुंड टपोरी पोरांनी हुल्लडबाजी करून ग्रामपंचायतीस टाळे ठोको करून रस्त्यावर टायर जाळून आंदोलन केले हे । पान २ वर

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमेचे मिरवणूक गावातून शांततेत झाले असताना टायर जाळून आंदोलन करण्यात मागचे हेतू काय यांची चौकशी होणे गरजेचे आहे व ग्रामपंचायत परवाना नाकारण्याची त्यांना नैतिक अधिकार काहीच नाही जर ते मिरवणूक काढू नये म्हणून ठराव घेत असेलतर सरपंच यांच्यावर दलित अत्याचार प्रतिबंधक कायदाने गुन्हा दाखल करण्यात यावे यापुढे वेशीच्या मध्ये मिरवणूक अणु देणार नाही असे जर ग्रामपंचायत सरपंच व गावगुंड टपोरी पोर म्हणत असेलतर त्याच्या विरोध गावात शांतता भंग करणे दहशत निर्माण करणे , मागासवर्गीय समाजाला वेठीस धरणे या कृत्याचा आधारे त्याच्यावर मोका लावण्यात यावे अशी मागणी रीपई नेते प्रा. राहुल रूही यांनी केले**

## महाराष्ट्रातील ८७ हून अधिक उमेदवार यशस्वी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) च्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

### केंद्रीय लोकसेवा आयोगाचा निकाल जाहीर

नवी दिल्ली : केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परिक्षेत देशातील एकूण १०१६ उमेदवार यशस्वी झाले आहेत. यापैकी राज्यातील ८७ हून अधिक उमदेवारांनी घवघवीत यश मिळविले आहे. एकूण निवड झालेल्या उमेदवारांपैकी जवळपास ८.६ टक्के महाराष्ट्रातून आहेत. राज्यातून समीर प्रकाश खोडे प्रथम, देशात त्यांनी ४२ वा क्रमांक पटकाविला आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोगाचा वर्ष २०२३ च्या मुख्य परिक्षेचा अंतिम निकाल मंगळवारी जाहीर झाला. या निकालात पहिल्या १०० उमेदवारांमधे महाराष्ट्रातील तीन उमेदवारांचा समावेश आहे. नेहा राजपूत यांनी ५१वा तर अनिकेत हिरडे यांनी ८१ वा क्रमांक पटकावला आहे.

**एक नजर निकालावर** : समीर प्रकाश खोडे (४२) नेहा उद्धवसिंग राजपूत (५१) अनिकेत ज्ञानेश्र्वर हिर्डे (८१) विनय सुनील पाटील (१२२) विवेक विश्र्वनाथ सोनवणे (१२६) तेजस सुदीप सारडा (१२८) जान्हवी बाळासाहेब शेखर (१४५) आशिष अशोक पाटील (१४७) अर्चित पराग डोंगरे (१५३) तन्मयी सुहास देसाई (१९०) ऋषिकेश विजय ठाकरे (२२४) अभिषेक प्रमोद टाले (२४९) समर्थ अविनाश शिंदे (२५५) मनीषा धारवे (२५७) शामल कल्याणराव भगत (२५८) आशिष विद्याधर उन्हाळे (२६७) शारदा गजानन मद्येश्र्वर (२८५) निरंजन महेंद्रसिंह जाधवराव (२८७) समिक्षा म्हेत्रे (३०२) हर्षल भगवान घोगरे (३०८) वृषाली संतराम कांबळे (३१०) शुभम भगवान थिटे (३५९) अंकेत केशवराव जाधव (३९५) शुभम शरद बेहेरे (३९७) मंगेश पाराजी खिलारी (४१४) मयूर भारतसिंग गिरासे (४२२) अदिती संजय चौगुले (४३३) अनिकेत लक्ष्मीकांत कुलकर्णी (४३७) क्षितिज गुरभेले (४४१) अभिषेक डांगे (४५२) स्वाती मोहन राठोड (४९२) लोकेश मनोहर पाटील (४९६) सागर संजय भामरे (५२३) मानसी नानाभाऊ साकोरे (५३१) नेहा नंदकुमार पाटील (५३३) युगल कापसे (५३५) हर्षल राजेश महाजन (५३९) अपूर्व अमृत बालपांडे (५४६) शुभम सुरेश पवार (५६०) विक्रम जोशी (५९३) प्रियंका मोहिते (५९५) अविष्कार डेरले (६०४) केतन अशोक इंगोले (६१०) राजश्री शांताराम देशमुख (६२२) संस्कार निलाक्ष गुप्ता (६२९) सुमित तावरे (६५५) सुरेश लीलाधरराव बोरकर (६५८) अभिषेक अभय ओझर्डे (६६९) नम्रता घोरपडे (६७५) जिज्ञासा सहारे (६८१) श्रृति कोकाटे (६८५) अजय डोके(६८७) सूरज प्रभाकर निकम (७०६) श्र्वेता गाडे (७११) अभिजित पखारे (७२०) कृणाल अहिरराव (७३२) हिमांशु टेभेंकर (७३८) सुमितकुमार धोत्रे (७५०) गौरी देवरे (७५९) प्रांजली खांडेकर (७६१) प्रितेश बाविस्कर (७६७) प्रशांत डांगळे (७७५) प्रतिक मंत्री (७८६) मयुरी माधवराव महल्ले (७९४) राहुल पाटील (८०४) सिध्दार्थ तागड (८०९) प्राजंली नवले (८१५) सिध्दार्थ बारवळ (८२३) ओमकार साबळे (८४४) प्रशांत सुरेश भोजने (८४९) प्रतिक बनसोडे (८६२) चिन्मय बनसोड (८९३) निखील चव्हाण (९००) विश्र्वजीत होळकर (९०५) अक्षय लांबे (९०८) निलेश डाके (९१८) किशनकुमार जाधव (९२३) ऐश्र्वर्या दादाराव उके (९४३) स्नेहल वाघमारे (९४५) शुभम त्रंबकराव डोंगरदिवे (९६३) गौरव हितेश टेंभुर्णीकर (९६६) मयांक खरे (९६८) शिवानी वासेकर (९७१) श्रावण अमरसिंह देशमुख (९७६) श्रुती उत्तम श्रोते (९८१) सुशीलकुमार सुनील शिंदे (९८९) आदित्य अनिल बामणे (१०१५)

केंद्र शासनाच्या विविध सेवांमधील रिक्त जागांसाठी सप्टेंबर २०२३ मध्ये मुख्य परीक्षा घेण्यात आली. जानेवारी - एप्रिल २०२४ दरम्यान परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या परिक्षेच्या निकालातील उत्तीर्ण १०१६ उमेदवारांची केंद्रीय लोकसेवा आयोगाने विविध सेवेतील पदांच्या नियुक्तीसाठी शिफारस केली आहे. यामध्ये सामान्य (ओपन) गटातून -३४७, आर्थिक मागास प्रवर्गातून (ईडब्ल्यूएस) ११५, इतर मागासवर्गीय प्रवर्गातून (ओबीसी) - ३०३, अनुसूचित जाती प्रवर्गातून (एससी) - १६५, अनुसूचित जमाती प्रवर्गातून- ८६ उमेदवारांचा समावेश आहे. एकूण यशस्वी उमेदवारांमध्ये ३७ दिव्यांग उमेदवारांचा (१६ ऑर्थोपेडिकली अपंग, ०६ दृष्टीहीन, ०५ श्रवणदोष आणि १० एकाधिक अपंग) यांचा समावेश आहे. लोकसेवा आयोगाने २४० उमेदवारांची आरक्षित सूची (ठशीशर्ीींश ङळीीं) तयार केली आहे. यामध्ये सामान्य गट- १२०, आर्थिक मागास प्रवर्ग (ईडब्ल्यूएस)- ३६, इतर मागास वर्ग -६६, अनुसूचित जाती- १०, अनुसूचित जमाती - ०४ उमेदवारांचा समावेश आहे. यासोबत एकूण चार दिव्यांग उमेदवारांचा समावेश आहे.

**या रिक्त पदांवर उमेदवार होतील रूजू**

भारतीय प्रशासन सेवा (आयएएस) या सेवेत शासनाकडे एकूण -१८० जागा रिक्त आहेत. यामध्ये सामान्य गट (जनरल) - ७३, आर्थिक मागास प्रवर्ग (ईडब्ल्यूएस) १७ इतर मागास वर्ग (ओबीसी) -४९, । पान २ वर

# संपादकीय

## उष्णतेची लाट आणि पाणी..

हवामान खात्याने इशारा दिला आहे की, तापमान आता ४० डिग्रीच्या वर जाण्याची शक्यता आहे. या इशाऱ्यातच भावी दुष्काळाचे गर्भित सावट आहे. कारण अजून दुष्काळाची परिस्थिती नसली तरीही ग्रामीण भागात दुष्काळ आणि पाण्याची टंचाई ही संकटे दबक्या पावलांनी येत आहेत. टँकर लॉबी सक्रिय झाली आहे आणि त्यांचा धंदा जोरात होण्यास सुरुवात झाली आहे. सोलापूर व परिसरातील तापमानात दिवसेंदिवस वाढ होत आहे. वाढत्या उन्हामुळे जनजीवन विस्कळीत बनले असून सकाळी दहानंतर घराबाहेर पडणे मुश्कील बनलेआहे. सध्याच उन्हाच्या काहिलीने अंग होरपळत आहे आणि अजून तर मे महिनाही जायचा आहे.

भारतात उष्णतेच्या प्रकोपाचा प्रश्न दरवर्षी असतो आणि ग्रामीण भागात तर त्याची तीव्रता इतकी प्रचंड असते की महिला, मुली डोक्यावर हंडे घेऊन मैलोन्मैल पायपीट करत जाऊन पाणी आणत असतात. हवामानातील सातत्याच्या बदलामुळे तापमान प्रचंड वाढत आहे आणि यालाच काही शास्त्रज्ञ ग्लोबल वॉर्मिंग म्हणतात. हवामानातील सातत्याने होणाऱ्या बदलाचा खरा फटका नेहमी शेतकऱ्यांना बसतो. आता मे महिनाही आला नाही तोच राज्यात अनेक भागांत उभी पिके उन्हात जळून गेल्याच्या बातम्या येत आहेत. ग्रामीण भागात पाण्याची टंचाई याच महिन्यात होते आणि लोक पाणी पाणी करत असतात. मराठवाडा, विदर्भ या कायम दुष्काळी भागात दहा किंवा वीस दिवसांनी पाणी येते. हे दरवर्षी दिसणारे चित्र आहे आणि ते बदलले पाहिजे. पण ग्रामीण भागातील पाण्याचा प्रश्न अतिगंभीर होण्याचे कारण म्हणजे बहुतेक लोक पाण्याच्या दैनंदिन गरजांसाठी भूजलावर अवलंबून राहतात. पाण्याचा बेसुमार उपसा सुरू असतो आणि अनेक तज्ज्ञांनी भूजलाचा स्तर खाली खाली जात असल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. पण सरकारने आणि स्वयंसेवी संस्थांनीही भूजलाचा कमी उपसा करण्यासाठी त्यांचे मन वळवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पण दुर्दैवाने तसे होत नाही आणि पाण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ येते. भारतीय हवामान खात्याने जो उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे, तो संपूर्ण भारतासाठी गंभीर आहे. या उष्णतेच्या लाटेमुळे अनेक दुष्परिणाम होणार आहेत आणि त्यात लोक आजारी पडणे, दुष्काळ, पाण्याची टंचाई निर्माण होणे आणि विजेची मागणी वाढणे अशा अनेक उपसंकटांचा समावेश आहे. आताच अगदी राज्याच्या अनेक भागांत दुष्काळाच्या झळा सुरूच झाल्या आहेत, तर अनेक ठिकाणी पाण्याचे दुर्भिक्ष जाणवू लागले आहे.

एक राम दशरथ का बेटा
एक राम घट घट मे लेटा
एक राम का सकल पसारा
एक राम है सब से न्यारा

प्रभू श्रीराम म्हणजे केवळ महाराजा दशरथ आणि महाराणी कौशल्या यांचा पुत्र नसून ज्याचं अस्तित्व कणाकणामध्ये आहे ही सर्व सृष्टी ज्याच्या इशाऱ्यावर चालते असा सर्वव्यापी राम.

यदा यदा ही धर्मस्य ग्लानिर्भवति भारत।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।।
परित्राणाय साधूनां विनाशायच च दुष्कृताम्
धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे ।।

जेव्हा जेंव्हा या धर्तीवर धर्माचा बोलबाला होऊन धर्म संकटात पडते तेव्हा तेव्हा ईश्र्वर अवतार घेऊन अधर्माचा नाश करण्यासाठी येत असतात.या उक्ती प्रमाणेचं भगवान विष्णूचा अवतार घेऊन राम जन्माला आले.युवराज रामाचं बालपण सुद्धा अन्य मुलांसारखे गुरुकुल मध्ये व्यतीत झाले.गुरू वशिष्ठ यांच्या कडून निती अनितीचे ज्ञान प्राप्त केले.तरुण अवस्थेत गुरूच्या आज्ञेप्रमाणे ऋषी मुनिवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी त्याच्या सुरक्षेसाठी काही काळ व्यतीत केला.भ्रमण करताना गुरुदेव सोबत सादर आमंत्रित म्हणून राजा जनक यांनी आयोजित केलेल्या राजपुत्री



सीता यांच्या स्वयांवरमध्ये जाण्याचा योग आला.स्वयांमवराची अट होती शिवधनुष्य वर प्रत्यंचा चढवायची आणि त्यासाठी सर्व निमंत्रित रथी महारथी असमर्थ ठरले.गुरू वशिष्ठ यांच्या आदेशानुसार युवराज रामाने स्वयंवर मध्ये सहभागी होऊन शिवधनुष्य सहज उचलला आणि माता सीतेला प्राप्त केले.विवाहा नंतरचा जीवन काळ खऱ्या अर्थाने त्यांच्या मानव कल्याणाचा काळ ठरला.राम सीतेला घेऊन अयोध्या मध्ये दाखल होताच त्यांच्या राज्याभिषेकाची घोषणा झाली.सर्वत्र आनंदाचे वातावरण पसरले होते.दुसऱ्या दिवशी सकाळी राज्यभिषेक होणार आणि सर्व जय्यत तयारी सुरू असताना अचानक कळतं की राजा दशरथ यांनी महाराणी कैकयीस दिलेल्या वचनाचे पालन करण्यासाठी युवराज श्रीराम १४ वर्षाचा वनवास भोगणारं.सगळीकडे ही बातमी पसरताच हाहाकार उडाला.

सर्वांचे लाडके असणारे युवराज न्यायप्रविष्ट,सर्वगुणसंपन्न,आणि रघुकुल रीतीचा मान सन्मान जपणारे म्हणून ज्यांची ओळख आहे अश्या मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामचंद्र यांचे जीवन चरित्र पूजनीय आहे कारण परिपूर्ण असं जीवन जगलेले प्रभू श्रीराम हे कर्तव्य परानिष्ट होते.त्यांच्या जीवन चरित्रावरून आचरणात आणण्या सारख्या काही बाबी आहेत.

पालकांच्या आदेशांचे पालन

भगवान राम हे ज्येष्ठ पुत्र होते, त्यामुळे अधोयाचे सिंहासन त्यांना सोपवले जाणार होते. पण माता कैकेयीच्या आज्ञेचे पालन करून त्यांनी राज्य चालवण्याऐवजी वनवास निवडला. यातून मानवाने हे शिकले पाहिजे की पालकांच्या आदेशाचे पालन करणे हे मुलाचे पहिले कर्तव्य आहे.

आदर्श भावाचे प्रतिक

एक आदर्श पुत्र असण्यासोबतच, रामजी हे एक आदर्श भावाचेही उत्तम उदाहरण आहेत. आजच्या कलियुगात जेव्हा भाऊ आपल्या भावाचा शत्रू होतो. अशा परिस्थितीत वाचनाचं पालन करण्यासाठी मोठे असताना भरता साठी मिळालेलं राज्य सोडून वनवासात जाणे निवडले.

श्री राम सारखे मित्र व्हा

मैत्री टिकवण्यातही रामजी आघाडीवर आहेत. केवत, सुग्रीव आणि विभीषण इत्यादि त्याचे परममित्र होते आणि त्यांनी स्वतः या सर्व संकटांना तोंड दिले. त्यांनी कोणताही भेदभाव न करता सर्वांशी मैत्री केली.

संयमाचे उत्तम उदाहरण

आजच्या काळात माणसामध्ये संयमाचा अभाव आहे, ज्यामुळे माणसाला अनेक समस्या निर्माण होतात. अशा परिस्थितीत रामजींचे जीवन हे संयमाचे उत्तम उदाहरण आहे. जेव्हा माता कैकेयीने रामजींना १४ वर्षांसाठी वनवासात जाण्याचा आदेश दिला तेव्हा रामजींनी पूर्ण संयमाने ते स्वीकारले. त्याच वेळी त्यांनी समुद्रावर पूल तयार करण्यासाठी तपश्र्चर्या केली. यासोबतच जेव्हा माता सीतेला पुन्हा वनात जावे लागले तेव्हा श्रीराम राजा असूनही संन्यासीसारखे जीवन जगले. मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम यांचा आदर्श घेऊन जीवन जगले तर नक्कीच पुन्हा रामराज्य येणं अशक्य नाही.

**पवन श्रीरंगसा कुसुंदल,नांदेड**
**संपर्क: ९०७५५९५६९५**

पान १ वरुन

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन

अनुसूचित जाती (एससी) – २७, अनुसूचित जमाती (एसटी) १४ जागा रिक्त आहेत. उमेदवारांच्या गुणानुक्रमे रिक्त जागांवर यशस्वी उमेदवारांची निवड केली जाईल.

भारतीय विदेश सेवा (आयएफएस) या सेवेत शासनाकडे एकूण – ३७ जागा रिक्त आहेत. यामध्ये सामान्य गट (ओपन) – १६, आर्थिक मागास प्रवर्ग(ईडब्ल्यूएस) ०४, इतर मागास वर्ग (ओबीसी) – १०, अनुसूचित जाती (एससी) – ०५, अनुसूचित जमाती (एस.टी.) – ०२ जागा रिक्त आहेत.

भारतीय पोलिस सेवा (आयपीएस) या सेवेमध्ये एकूण – २०० जागा रिक्त आहेत, यामध्ये सामान्य गटातून (ओपन) – ८०, आर्थिक मागास प्रवर्ग (ईडब्ल्यूएस) २०, इतर मागास प्रवर्गातून – ५५, अनुसूचित जाती प्रवर्गातून – ३२, तर अनुसूचित जमाती प्रवर्गातून – १३ उमेदवारांना नियुक्ती दिली जाणार आहे.

केंद्रीय सेवा गट अ – या सेवेमध्ये एकूण – ६१३ जागा रिक्त आहेत. यामध्ये सामान्य गटातून (ओपन) – २५८, आर्थिक मागास प्रवर्ग (ईडब्ल्यूएस) ६४ , इतर मागास प्रवर्गातून – १६०, अनुसूचित जाती प्रवर्गातून – ८६ तर अनुसूचित जमाती प्रवर्गातून –४५ उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल.

केंद्रीय सेवा गट ब – या सेवेमध्ये एकूण – ११३ जागा रिक्त आहेत. यामध्ये सामान्य गटातून (ओपन) – ४७, आर्थिक मागास प्रवर्ग(ईडब्ल्यूएस) १० उमेदवार, इतर मागास प्रवर्गातून – २९, अनुसूचित जाती प्रवर्गातून – १५ तर अनुसूचित जमाती प्रवर्गातून –१२ उमेदवारांना नियुक्ती दिली जाईल.

संघ लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) च्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश. डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे या महाराष्ट्राच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या स्वायत्त संस्थेमार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांसाठी संघ लोकसेवा आयोग (युपीएससी) मार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांचे पूर्व प्रशिक्षण देण्यात येते. तसेच मुख्य परीक्षा व मुलाखत चाचणी परीक्षेकरिता पात्र झालेल्या उमेदवारांना आर्थिक साहाय्य दिले जाते.बार्टी तर्फे येरवडा संकुल येथे ७० विद्यार्थ्यांसाठी निवासी प्रशिक्षण सुरु करण्यात आले आहे . तसेच दिल्ली येथील नामांकित खाजगी प्रशिक्षण केंद्रांत बार्टीचे ३०० विद्यार्थी प्रशिक्षण घेत असतात .दिनांक १६/०४/२०२४ रोजी लागलेल्या संघ लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या नागरी सेवा २०२३ परीक्षेच्या निकालात बार्टीच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

या निकालात बार्टी संस्थेच्या एकूण १६ विद्यार्थ्यांची निवड झाली असून विद्यार्थ्यांना खालील प्रमाणे रँक मिळाल्या आहेत

१. विवेक विश्र्वनाथ सोनवणे – १२६ वी रँक
२. वृशाली संतराम कांबळे – ३१० वी रँक
३. प्रियांका सुरेश मोहिते – ५९५ वी रँक
४. सुरेश लीलाधरराव बोरकर – ६५८ वी रँक
५. नम्रता दामोदर घोरपडे – ६७५ वी रँक
६. सुमितकुमार दत्ताहरीराव धोत्रे – ७५० वी रँक
७. काजल आनंदकुमार चौहान – ७५३ वी रँक
८. प्रांजली मनोहर खांडेकर – ७६१ वी रँक
९. प्रशांत सुरेश भोजने – ८४९ वी रँक
१०. प्रतीक दादासाहेब बनसोडे – ८६२ वी रँक
११. चिन्मय गिरीष बनसोड – ८९३ वी रँक
१२. निलेश प्रकाशराव डाके – ९१८ वी रँक
१३. स्नेहल ज्ञानोबा वाघमारे – ९४५ वी रँक
१४. शुभम त्र्यंबकराव डोंगरदिवे – ९६३ वी रँक
१५. गौरव हितेश टेंभुर्णीकर – ९६६ वी रँक
१६. सुशीलकुमार सुनील शिंदे – ९८९ वी रँक

या सर्व विद्यार्थ्यांना बार्टी कडून परीक्षेच्या विविध टप्प्यावर मार्गदर्शन व आर्थिक साहाय्य देण्यात आले आहे असे बार्टीचे महासंचालक श्री सुनिल वारे यांनी सांगितले.

बार्टी कडून यशदा येथे संघ लोकसेवा आयोग नागरी सेवा मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांसाठी अभिरूप मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. अभिरूप मुलाखतीच्या पॅनल वर राज्याचे माजी मुख्य सचिव श्री अजित निंबाळकर , बार्टीचे महासंचालक व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यूपीएससी विभागाला सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव श्री सुमंत भांगे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले .त्यामुळे हे यश संपादन करता आले असे मा महासंचालक बार्टी पुणे यांनी सांगितले.

बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व पुढील वाटचालीकरिता हार्दिक शुभेच्छा दिल्या तसेच युपीएससी विभागाचे विभागप्रमुख सतीश पाटील व त्यांच्या टीमचे अभिनंदन केले. एकूण ३५५ उमेदवारांची निवड तात्पुरत्या स्वरुपाची असेल. अधिकृत निकाल व यशस्वी उमदेवारांची नावे केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या www.upsc.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

## नागणसूर मध्ये अखेर वेशी मधून

लाजिरवाणी गोष्ट असून जगभर ज्या महापुरुषाने जयंती साजरी होतो ते करण्यास गावातील काही गावगुंड टपोरी मुलांनी करत असेल तर त्यावर पोलिसांनी कडक कार्यवाही करण्यात यावे कारण पोलिसांकडे सर्व व्हिडिओ चित्रीकरण असून त्यात जे हुल्लडबाजी करून मागासवर्गीय समाजाबद्दल कालच्या पातळीवर घोषणाबाजी केले आहे त्यावर प्रशासनाने कठोर कार्यवाही करावी असे तालुक्यातील भीम सैनिकांचे मागणी होत असून कार्यवाही न झाल्यास अनु.जाती जमाती आयोग दिल्ली व मुंबई यांच्याकडे रीतसर तक्रार करण्यात येणार असल्याचे माहिती आमच्या प्रतिनिधीशी बोलताना भीम सैनिक व्यक्त केले

अक्कलकोट तालुक्यातील नागणसूर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यावरून वाद निर्माण झाला असून त्याचे पर्यावसान टायर जाळून रास्ता रोको आंदोलनात झाले आहे. संपूर्ण गावात तणावपूर्ण शांतता असून पोलीस बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. अक्कलकोटच्या दक्षिण बाजूला असलेल्या नागणसूर गावात डॉ. आंबेडकर जयंती साजरी करण्यावरून दरवर्षी वाद होतो. गावात आंबेडकरी समाजाकडून डॉ. बाबासाहेबांची जयंती साजरी करताना गावच्या वेशीतून मिरवणूक नेण्यास गावक–यांकडून विरोध होतो. वादाचे हेच प्रमुख कारण आहे. यापूर्वी याच कारणावरून गावात हाणामारीचे प्रकार घडले होते. विशेषतः मिरवणुकीत उधळलेला निळा रंग रस्त्याच्या कडेला घरांसमोर उभ्या राहिलेल्या महिलांच्या अंगावर पडल्याच्या कारणावरून सवर्ण–दलित संघर्ष झाला होता. गेल्या २०१४ सालापासून गावात डॉ. आंबेडकर जयंती साजरी झाली नव्हती.या पार्श्र्वभूमीवर यंदा डॉ. आंबेडकर जयंती साजरी करण्यास पोलिसांनी सुरूवातीला परवानगी नाकारली होती. परवानगी मिळण्यासाठी गावातील आंबेडकरी समाजाच्या शिष्टमंडळाने जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांची भेट घेतली असता शेवटी प्रातिनिधिक स्वरूपात केवळ पाच व्यक्तींच्या उपस्थितीत डॉ. आंबेडकर जयंती उत्सवाची मिरवणूक काढण्यास परवानगी देण्यात आली होती. त्यानुसार सकाळी पाच व्यक्तींनी प्रातिनिधिक स्वरूपात डॉ. आंबेडकर जयंती उत्सवाची मिरवणूक काढली. परंतु या मिरवणुकीला विरोध करीत गावातील सवर्ण समाजाच्या मंडळींनी लगेचच गावातील चौकात एकत्र येऊन टायर जाळून ‘रास्ता रोको’ आंदोलन सुरू केले. आंदोलकांनी ‘जय श्रीराम’ च्या घोषणा दिल्या. पोलीस अधिकारी समजूत घालत असताना त्यांचे कोणीही ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते. त्यामुळे गावात तणावाचे निर्माण होऊन संपूर्ण बाजारपेठ बंद झाली. गावात डॉ. आंबेडकर जयंती साजरी करण्यास गावक–यांचा विरोध आहे, या गावात बहुसंख्येनेवीरशैव लिंगायत समाज राहतो. भाजप आणि कॉंग्रेस या दोन्ही पक्षांची ताकद आहे. यंदा लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर नागणसुरात घडलेल्यि घटनेचे पडसाद निवडणूक प्रचारात उमटण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

## यंदा उत्तम पावसाचा अंदाज..

दक्षिण भारत, उत्तर भारतात चांगला पाऊस पडण्याचा अंदाज असला तरीही, जम्मू–काश्मीर, लडाख, ईशान्य भारत आणि ओडिशा, छत्तीसगड, झारखंड आणि पश्र्चिम बंगालच्या काही भागात सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज आहे. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात नैऋत्य मोसमी पावसाचा सुधारित अंदाज जाहीर केला जाईल, त्यावेळी महिनानिहाय पावसाची शक्यता जाहीर केली जाईल, असेही महापात्रा म्हणाले.

## भाजपचे उमेदवारी अर्ज दाखल....

मिरवणुकीत हिंदुत्वाचा गजर केला जात होता. भाजपचे जिल्हाध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी, सुभाष देशमुख, विजय देशमुख, जयकुमार गोरे, समाधान अवताडे या सर्व भाजपच्या आमदारांसह राष्ट्रवादी अजित पवार गटाचे बबनराव शिंदे, संजय शिंदे, यशवंत माने हे आमदार एकवटले होते. शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे आमदार ड. शहाजीबापू पाटील व अन्य पदाधिकाऱ्यांचा सहभाग होता.

सोलापूर लोकसभेसाठी आमदार राम सातपुते यांनी जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांच्या सोबत भाजपचे आमदार सुभाष देशमुख, मोहोळ तालुक्यातील राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते राजन पाटील–अनगरकर आदी उपस्थित होते. तर माढा लोकसभेसाठी खासदार रणजितसिंह निंबाळकर हे निवडणूक अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी मोनिकासिंह ठाकूर यांच्याकडे उमेदवारी अर्ज दाखल करताना माढ्याचे राष्ट्रवादी अजितषपवार गटाचे आमदार बबनराव शिंदे, करमाळ्याचे अपक्ष आमदार संजय शिंदे, माण–खटावचे भाजपचे आमदार जयकुमार गोरे आणि सांगोल्याचे शिवसेना शिंदे गटाचृ आमदार ॲड. शहाजीबापू पाटील यांची उपस्थिती होती.

## अयोध्येतल्या मंदिरातील रामलल्लाचं ..

सरचिटणीसांनी रामलल्लांच्या जयंतीनिमित्त लोकांना मोबाइल फोन सोबत आणू नका, असे आवाहन केले आहे.

रामनवमीच्या दिवशी ब्रह्म मुहूर्तावरच दर्शन रांगेत उभं राहण्याची व्यवस्था केली गेली. रामलल्लाची मंगल आरती सुरू होण्याच्या एक तास आधीच भाविकांनी दर्शनासाठी रांग लावली. तर, भगवान रामाला दुग्धाभिषेकही करण्यात आला. चांदीच्या भांड्यातून दूध शंखात ओतत आहेत, शंखाद्वारे रामाच्या मूर्तीवर दुग्धाभिषेक केला गेला. अयोध्येतला पारा सध्या चाळीशीपार आहे. उन्हापासून संरक्षण करण्यासाठी प्रत्येकानं काळजी घेण्याचं आवाहन करण्यात येत आहे. मंदिर परिसरात भक्तांचे पाय उन्हाने पोळू नयेत यासाठी खास मॅटही अंथरल्या गेल्या आहेत. भाविकांनी आपलं डोकं झाकून उन्हापासून स्वतःच रक्षण करावं असं आवाहनही करण्यात आलं आहे.

## भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई सुरूच ..

व्यक्ती पंतप्रधान होऊ शकली असे मोदींनी नमूद केले.

राष्ट्रीय जनता दलाचे सर्वेसर्वा लालूप्रसाद यादव यांनी भाजपला घटना बदलायची आहे असा आरोप केला होता. त्याला अप्रत्यक्षपणे पंतप्रधानांनी उत्तर दिले. राष्ट्रीय जनता दलावर त्यांनी टीका केली. पुर्णियातील सभेला मुख्यमंत्री नितीशकुमार उपस्थित नव्हते. विशेष म्हणजे संतोष कुशवा या त्यांच्याच पक्षाच्या उमेवारासाठी ही सभा झाली. बालूरघाटः सुधारित नागरिकत्व कायद्याला विरोध करत, तृणमूल कॉंग्रेस घुसखोरांना संरक्षण देऊ पाहात आहे असा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. राज्यात तृणमूल कॉंग्रेसने गुंडांना मोकळे रान दिल्याची टीका पंतप्रधानांनी येथील सभेत केली. राज्यात रामनवमी उत्सवाला तृणमूल सरकार विरोध करते. कोलकाता उच्च न्यायालयाने हावडा येथे विश्र्व हिंदू परिषदेच्या मिरवणुकीला परवानगी देण्याचा निर्णय सत्याचा विजय असल्याचे पंतप्रधानांनी नमूद केले. संदेशखालीचा मुद्दा उपस्थित करत, गुन्हेगारांना तृणमूल कॉंग्रेसने कसे संरक्षण दिले? हे देशाने पाहिले आहे. भ्रष्टाचार, गुन्हेगारी राज्यात फोफावल्याची टीका पंतप्रधानांनी केली.

## विश्र्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून लोंढे परिवाराच्या वतीने तथागत गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या दोन मुर्त्या दान

करमाळा प्रतिनिधी / आज विश्र्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कालकथित बबन बाबुराव लोंढे व कालकथित पुष्पा बबन लोंढे यांच्या स्मरणार्थ लोंढे परिवाराच्या वतीने तथागत गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या दोन मुर्त्या भारतीय बौद्ध महासभा शाखा करमाळा यांना आयु.भालचंद्र बाबुराव लोंढे यांच्या हस्ते दान करण्यात आल्या

यावेळी विश्र्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी व करमाळा शहरातील सर्व बोध्द उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थितीत होते या मंगल प्रसंगी बौद्धचार्य व केंद्रीय शिक्षक प्रशांत कांबळे व बौध्दाचार्य सावताहारी कांबळे यांनी बौद्ध वंदना घेऊन या मुर्त्यांचा स्वीकार केला. यावेळी लोंढे परिवारातील भालचंद्र लोंढे राकेश लोंढे राहुल लोंढे विशाल लोंढे अभिजीत लोंढे चि.पुष्पराज लोंढे आदी.सदस्यांच्या हस्ते या मुर्त्या देण्यात आल्या.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# वागदरीतून अर्चनाताई पाटील याना मताधिक्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार : महायुतीच्या बैठकीत निर्धार



वागदरी/एस.के.गायकवाड : होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीत उस्मानाबाद (धाराशिव) लोकसभा मतदारसंघातील भाजपा शिवसेना (शिंदे) राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) रिपाइं (आठवले) व मित्रपक्षांच्या महायुतीचे उमेदवार अर्चनाताई पाटील याना तुळजापूर तालुक्यातील वागदरी गावातून मताधिक्य मिळवून देण्यासाठी जाणिव पुर्वक प्रयत्न करणार असल्याचे कार्यकर्ते यांनी निर्धारपुर्वक बैठकीत सांगितले.

जि.प.नंदगाव गटाचे गट प्रमुख सिध्देश्र्वर आण्णा कोरे यांनी वागदरी येथे उस्मानाबाद (धाराशिव) लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवार अर्चनाताई पाटील यांच्या प्रचारार्थ महायुतीच्या सर्व घटक पक्षांच्या कार्यकर्त्यांची बैठक घेऊन महायुतीचे उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) च्या अर्चनाताई पाटील यांच्या घड्याळ या चिन्हासमोरील बटन दाबून अर्चनाताई पाटील याना विजयी करून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करा असे आवाहन केले असता उपस्थित कार्यकर्ते यांनी वागदरीतून अर्चनाताई पाटील याना मताधिक्य देण्यासाठी जाणिव पुर्वक प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

या प्रसंगी भिवा इंगोले, विवेकानंद मिलगीरे,अंगद जाधव, भाजपा वागदरी बुथ प्रमूख तथा पत्रकार किशोर धुमाळ, दत्ता पाटील,बाळू पवार शिवसेना बाळासाहेब ठाकरे (एकनाथ शिंदे) चे मदन पाटील,

प्रकाश सुरवसे,मनसेचे गणेश बिराजदार, रिपाइं (आठवले) चे एस.के.गायकवाड,अनिल वाघमारे अंबादास झेंडारे, ग्रा.प.सदस्य ज्ञानेश्र्वर पाटील, भालचंद्र यादव,किशोर सुरवसे,अमोल परीहार,रामसिंग परिहार किशोर सुरवसे,दत्ता पाटील,बाळु पवार,नेताजी माडजे, राजेंद्र बिराजदार,जितेंद्र पाटील .रामकृष्ण पाटील प्रशांत बिराजदार भालचंद्र यादव सह कार्यकर्ते उपस्थित होते.

# केंद्र सरकारने वृत्तपत्र खरेदी करणाऱ्यांना उत्पन्न करात वार्षिक पाच हजार रुपये सूट द्यावी

## प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या मागणीला पाठिंबा : खा.ओमराजे निंबाळकर



धाराशिव : कोरोना काळानंतर महाराष्ट्रासह सबंध देशात वृत्तपत्र व्यवसायावर मोठा परिणाम झाला असून खप आणि जाहिरातींचे प्रमाणही कमी झाले आहे. यासाठी केंद्र सरकारने वृत्तपत्र खरेदी करणाऱ्या आयकरदात्यांना उत्पन्न करात वार्षिक पाच हजार रुपयांची सूट द्यावी ही पत्रकार संघाच्या मागणी रास्त असून आपाला पाठिंबा आहे. अशी ग्वाही धाराशिव लोकसभेचे विद्यमान खासदार आणि महाविकास आघाडीचे विद्यमान उमेदवार ओमराजे निंबाळकर यांनी दिली.प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केंद्र सरकारकडे केलेली मागणी वृत्तपत्रांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करणारी आहे.त्यामुळे पुन्हा लोकसभेत गेल्यावर यासाठी पाठपुरावा करू असेही सांगितले.

धाराशिव येथे मंगळवार दिनांक १७ एप्रिल २०२४ रोजी महाविकास आघाडीचे उमेदवार तथा धाराशिव चे विद्यमान खासदार माननीय श्री ओमराजे निंबाळकर यांची पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर निवेदन दिले. यावेळी पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी, राज्य कार्यकारणी सदस्य बाबासाहेब देशमाने यांच्यासह धाराशिव चे जिल्हाध्यक्ष धनंजय पाटील पत्रकार संघाचे धाराशिव येथील पदाधिकारी पत्रकार श्रीराम क्षीरसागर, रामेश्र्वर डोंगरे, सय्यद कलीम मुसा यासह पत्रकार बांधव उपस्थित होते यावेळी मागणी विषयी माहिती देताना प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे म्हणाले की, केंद्र सरकार खाजगी विमा कंपन्यांचा व्यवसाय वाढावा आणि लोकांनी विमा घ्यावा यासाठी विमा घेणाऱ्या ग्राहकाला वार्षिक उत्पन्न करात एका विमा हप्त्या इतक्या रक्कमेची सूट दिली जाते. तसेच अनेक छोट्या-मोठ्या उद्योगांना सरकार वेगवेगळ्या स्वरूपाची प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष आर्थिक मदत देते. याच धर्तीवर वृत्तपत्र खरेदी करणाऱ्या आयकर दात्यांना वार्षिक पाच हजार रुपयांची सूट दिली तर देशातील ३५ हजार कोटींच्या व्यवसायाला,उर्जित अवस्था प्राप्त होईल. यातून मागणी वाढल्याने मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल. तसेच या व्यवसायातील लोकांना आर्थिक स्थिरता येईल. आणि वाचन संस्कृतीचीही जोपासना होईल. महाराष्ट्रात सध्या शासनाच्या यादीवर असलेले दीड हजार वृत्तपत्र व साप्ताहिके आहेत. या व्यवसायावर अवलंबून असणारे हजारो लोक आहेत.

यासाठी आपण पुढाकार घ्यावा आणि केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा अशी विनंती केली.देशातील मीडियाच्या आर्थिक हितासाठी ही मागणी रास्त असल्यामुळे मी या पाठिंबा देत आहे. मी लोकसभेच्या सभागृहात गेल्यावर हा विषय मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करेल अशी ग्वाही ओमराजे निंबाळकर यांनी दिली.

# सोलापूर लोकसभा इंडिया आघाडीचे उमेदवार प्रणिती शिंदे राम नवमीला प्रचाराचा शुभारंभ पंढरपूरसह विविध धार्मिक स्थळांना भेट देणार



पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या इंडिया आघाडीच्या उमेदवार आमदार प्रणिती शिंदे या रामनवमीच्या मुहूर्तावर १७ एप्रिल २०२४ रोजी प्रचाराचा शुभारंभ करणार आहेत बुधवारी त्या सर्वप्रथम पंढरपुरात श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेऊन आहेत त्या ठिकाणी नारळ वाढवून त्या आपल्या प्रचाराच्या शुभारंभ करतील त्यानंतर त्या मतदारसंघातील विविध धार्मिक स्थळांना भेटी देणार असलेले माहिती काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन

प्रणिती शिंदे या पंढरपुरातील बुधवारी सकाळी आठ वाजता प्रचाराचा शुभारंभ करतील त्यानंतर सकाळी साडेदहा वाजता सुमारास गार्डी येथील यमाई मंदिराचे दर्शन घेतील त्यानंतर बारा वाजता बाळे येथील खंडोबा मंदिरात भेट देतील येथून त्या अक्कलकोट कडे रवाना होतील व दुपारी दोन वाजता श्री स्वामी समर्थ मंदिराचे दर्शन घेतील व त्यानंतर चार वाजता अतुल येथील श्री स्वामी समर्थ दर्शन घेऊन सोलापूर कडे मार्गस्थ होतील यादरम्यान सायंकाळी साडेपाच वाजता सुमारास त्या सोलापुरातील मार्कंडे मंदिरातील दर्शन घेतील व पुढे सहा वाजून सुमारास सोलापूर ग्रामीण दैवत श्री सिद्धेश्र्वराचे दर्शन घेतील आणि सात वाजता शहरातील जगदंबा चौक येथील राम मंदिराला भेट देऊन प्रभू श्री राम मंदिराचे दर्शन घेतील यानंतर या सभेला या प्रचाराचा शुभारंभ कार्यक्रम प्रसंगी त्या त्या विधानसभा मतदारसंघातील इंडिया आघाडी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना मोठ्या संख्येने नियोजित स्थळी उपस्थित राहावे असे आव्हान निवडणूक प्रमुख प्रकाश तेलगुलवार सोलापूर शहर काँग्रेस कमिटी चेतन नरोटे जिल्हा काँग्रेस कमिटी कार्याध्यक्ष नंदकुमार पवार यांच्या वतीने

# डॉ.आंबेडकर जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न




वागदरी/एस.के.गायकवाड : दि १४ एप्रिल २०२४ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद (संभाजी नगर) उपपरिसर उस्मानाबाद (धाराशिव) येथे महात्मा फुले यांची १९७ वी व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती निमित्त अर्थात गुरू शिष्याला आणि त्यांच्या विचारांना अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठ उप परिसराचे संचालक प्रा.डॉ.प्रशांत दीक्षित हे होते तर प्रमुख वक्ते म्हणून आंबेडकरी चळवळीतील विचारवंत जेष्ठ कार्यकर्ते प्रा.डी.डी.मस्के (बार्शी) हे होते.या प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून प्रा.डी.डी.मस्के यांनी फुले-शाहू-आंबेडकर विचारधारा या विषयाची मांडणी केली.शिक्षण,आरक्षण,जल(पाणी), कृषी या चार मुद्यांवर या महापुरुषांच्यामध्ये कसा समन्वय होता याची चर्चा घडवून आणली. या कार्यक्रमाचे सुत्र संचालन व आभार प्रा.विक्रांत शिंदे यांनी केले.यावेळी प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मंदिर समितीस नागपूर येथील भाविकाकडून १ लक्ष रूपयाची देणगी



पंढरपूर/प्रतिनिधीः स्व. सुधा मोतीराम मावदेकर यांचे स्मरणार्थ शरयू सर्वनन आय्यर यांच्या तर्फे श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीस १ लक्ष रूपयाची देणगी दिली आहे. त्याबद्दल त्यांचा विभाग प्रमुख श्री.पांडूरंग बुरांडे यांच्या शुभहस्ते श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन यथोचित सन्मान केला. त्यावेळी कर्मचारी श्री योगेश कागदे व श्री वैभव तुरेवाले उपस्थित होते. श्री आय्यर हे पार्वती नगर, नागपूर येथील रहिवाशी आहेत. त्यांनी आज धनादेशाद्वारे मंदिर समितीस देणगी दिली आहे.

सद्यस्थितीत, चैत्री यात्रेचा कालावधी सुरू असून, भाविकांची गर्दी वाढत आहे. देणगी घेण्यासाठी जादा स्टॉलची निर्मिती, ऑनलाईन देणगीसाठी QR CODE, RTGS ची सुविधा उपलब्ध असून, देणगीसाठी इच्छुक भाविकांनी श्री संत तुकाराम भवन येथील कार्यालयास संपर्क साधावा असे विभाग प्रमुख श्री पांडूरंग बुरांडे यांनी सांगीतले.

# डब्ल्युआयटी मधील 'विचार-२४' या स्पर्धेमध्ये स्वेरीच्या विद्यार्थ्यांचे यश; स्वेरीत संशोधन विभागाला मिळतेय गती



पंढरपूर-/प्रतिनिधी : सोलापुर येथील वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (डब्ल्युआयटी) मध्ये दि. २२ व २३ मार्च रोजी झालेल्या 'विचार-२४' या राष्ट्रीय दर्जाच्या तांत्रिक परिसंवाद स्पर्धेत स्वेरीच्या दोन विद्यार्थ्यांना उत्तुंग यश मिळाले. तेथील स्पर्धेमध्ये आपल्या प्रोजेक्टचे सादरीकरण करून या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. स्वेरीमध्ये शिक्षणाबरोबरच संशोधनावर देखील अधिक भर दिला जात असून विद्यार्थीही संशोधनामध्ये रस घेऊन यश संपादन करत आहेत. नवनवीन प्रकल्प निर्मितीकडे स्वेरीतील विद्यार्थ्यांचा कल असल्याचे दिसून येत आहे. आता या पुरस्काराने स्वेरीतील संशोधन विभागाला आणखी गती मिळाली आहे, हे मात्र नक्की ! 'विचार २४' या तांत्रिक परिसंवाद स्पर्धेमध्ये गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरी संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागात तृतीय वर्षात शिक्षण घेणारे सत्यजित विठ्ठल गोफणे व द्वितीय वर्षात शिक्षण घेणारे चैतन्य लक्ष्मण सोनवणे यांनी ऑटो डिस्क कंपनी प्रायोजक असलेल्या 'युनिव्हर्स डिझाईन चॅलेंज' या इव्हेंट मध्ये प्रथम क्रमांक मिळविला. या स्पर्धेत दोघांनी मिळून ड्रोन वरील इमर्जन्सी रिस्पॉन्स ड्रोनचे मॉडेल बनविले. याद्वारे आपत्कालीन परिस्थितीमध्ये ड्रोनच्या साह्याने बचाव कार्य, वैद्यकीय सेवा पुरवठा व थ्रीडी मॅपींग अशी तीन कार्ये एकाच ड्रोनच्या माध्यमातून करण्यासाठी त्यांनी नवीन उपकरण तयार करून दाखविले. अत्यंत नवीन प्रकारे हा प्रकल्प बनविल्यामुळे या प्रकल्पाला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. सत्यजित गोफणे व चैतन्य सोनवणे यांना रोख रू. १२ हजार, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन तेथील मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. दोघांना संस्थेचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी. पी. रोंगे, विभागप्रमुख डॉ.एस.बी.भोसले, प्रा.पी. बी.आसबे तसेच विभागातील इतर शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. प्रथम क्रमांक मिळाल्यामुळे सत्यजित गोफणे व चैतन्य सोनवणे यांचा संस्थेच्या वतीने संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी. पी. रोंगे यांच्या हस्ते विठ्ठल गोफणे, सौ. पल्लवी गोफणे, डॉ. एस.एस. वांगीकर, डी.टी.काशिद व इतर प्राध्यापकांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. तांत्रिक परिसंवाद स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाल्यामुळे संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्र्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी सत्यजित गोफणे व चैतन्य सोनवणे यांचे अभिनंदन केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारानेच समाजाची प्रगती साधता येईल...



गोदिंया : या जगाला परंपरेच्या बंधनातून मुक्त करुन, स्वतः उच्च विद्याविभूषित होऊन, समाजाला गतिमान केले. समाजाचे उध्दार करण्यासाठी शिक्षण हे महत्त्वाचे आहे. या विचारसरणीने समाज पूढे गेला पाहिजे. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराची समाजाला फार आवश्यकता आहे. हे विचारच माणसाचे जीवन बदलू शकते, म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारानेच समाजाची प्रगती साधता येईल. असे प्रतिपादन युवा समाज प्रबोधनकार व मार्गदर्शक मुन्नाभाई नंदागवळी यांनी केले. ते पंचशील बौध्द समाज नंगपूरा-मुर्री येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती कार्यक्रमाचे मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

यावेळी विचार मंचावर समाजाचे जेष्ठ शुभम जांभूळकर यांच्या अध्यक्षतेखाली मुख्य मार्गदर्शक म्हणून मुन्नाभाई नंदागवळी, प्रदीप ढवळे, गोपाल नंदेश्र्वर, पंचायत समिती सदस्य सयजा सोनवणे, कविता लिचडे सरपंच, शेखर शहारे उपसरपंच हितेंद्र नंदेश्र्वर, विजय भैसारे, इंद्रकला पारधी, मंदा भिवगडे, सुधा टेंभेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुंबई येथे राहणारे उत्तमदास टेंभेकर यांनी समाजाला मंच स्टेज दान केले त्याचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तथागत बुद्ध आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मंचावर पाहूण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सन्मान करण्यात आला. त्रिशरण पंचशील सामुहिक ग्रहण करण्यात आली. डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती कार्यक्रम संचालन महेंद्र टेंभेकर यांनी केले तर आभार पंकज भैसारे व कमल साखरे यांनी मानले. जयंती थाटामाटात साजरी करण्यासाठी पंचशील बौध्द समाज येथील मेहूल टेंभेकर, संदीप टेंभेकर मोंटी इंदूरकर कमल साखरे देवा शहारे ममता टेंभेकर रेखा इंदुरकर भरती टेंभेकर मंगला भैसारे सुनंदा जांभूळकर सुनिता टेंभेकर यांनी परिश्रम घेतले.

# गगनचुंबी इमारती,कमर्शियल बेसमेंट प्रशासन अनभिज्ञ, मुरमाची मॅनेजमेंट. गेला मुरूम कुणीकडे...

मंगरूळपीर/गौरवकुमार इंगळे :शहरातील मुख्य जागा खरेदी करून विकासकानी त्यावर बहुमजली इमारती बांधल्या सदर इमारती व्यावसायिक तसेच रहिवासी दृष्टिकोनातून बांधल्या आहेत. प्राप्त जागेच्या प्रत्येक कानाकोपऱ्याचा पुरेपूर उपयोग करून सदर इमारतींचे मूल्य कोट्यावधीच्या घरात नेले. मात्र सदर उद्देश साधत असताना विकासकांनी प्रशासनाची दिशाभूल करण्यात कसलीही कसर सोडली नाही.



बहुमजली इमारतीचे तळघर विकसित करत असताना त्यातून हजारो ब्रास मुरूम काढण्यात आला. सदर मुरूम काढून त्या ठिकाणी बहुतांश जागा तयार करण्यात आली व या बेसमेंटचे सुद्धा व्यावसायिकरण करून त्यातून बक्कळ असा पैसा उभारण्यात आला. परंतु हे करत असताना त्या ठिकाणी योग्य त्या उत्खननाच्या व वाहतुकीच्या परवानगी घेतल्या गेल्या नसल्याचे महसूल विभागातून कळले. जिल्हा खनिकर्म कार्यालयातून प्राप्त माहिती नुसार त्या ठिकाणावरून उत्खनन झालेला मुरूम जर त्याच परिसरात संचय केला जात असेल तर त्यासाठी परवानगीची गरज नसते. परंतु हजारो ब्रास मुरूम गेला तरी कुठे हा प्रश्न निर्माण होतो. इमारतींच्या बाजूला संचय करण्यात आलेला मुरमाचे प्रमाण व तळघर खोदून त्या ठिकाणाहून बाहेर काढलेल्या मुरमाचे प्रमाण यात नक्कीच तफावत असल्याचे लक्षात येते. त्यामुळे हा मुरूम नेमका कुठे नेण्यात आला व या मुरुमाची वाहतूक होत असताना स्वामित्वाच्या पावत्या महसूल प्रशासनाकडून घेण्यात येणे अपेक्षित आहे. त्यामुळे विकासकांकडून तळघराचा विकास होत असताना त्यातून काढलेल्या गौण खनिजाचे विनीयोग कशाप्रकारे झाला यावर प्रशासनाचे स्पष्ट दुर्लक्ष झाल्याचे दिसून येत आहे.

सदर बाब प्रशासनाच्या लक्षात आल्यानंतर सुद्धा प्रशासन यावर नेहमीप्रमाणे दुर्लक्ष करेल की अहवाल सादर करण्याचे आदेश देईल अशी चर्चा परिसरातील नागरिकांमध्ये आहे

# महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आरोग्य शिबीरात ३५० कर्मचाऱ्यांची तपासणी

सोलापूर/प्रतिनिधीः थोर समाज सुधारक महात्मा ज्योतीराव फुले व भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय सोलापूर येथे जिल्ह्यातील विजाभज प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांकरीता चालविण्यात येणाऱ्या प्राथमिक, माध्यमिक , उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील शिक्षकेत्तर कर्मचारी व वसतिगृह कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य शिबीर आयोजन करण्यात आले होते. या आरोग्य शिबीरात ३५० कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय सोलापूर व फॅमिली प्लॅनिंग असोशिएशन ऑफ इंडिया शाखा, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांकरीता आयोजित करण्यात आलेले आरोग्य शिबीर यशस्वीरित्या पार पाडले. सदर आरोग्य शिबीरामध्ये सोलापूर जिल्ह्यातील आश्रमशाळेतील शिक्षकेत्तर व वसतिगृहातील कर्मचारी यांची रक्तातील हिमोग्लोबीनचे प्रमाण तपासणी, बी. पी. तपासणी, विविध आजारावरील गोळ्या व औषधे, डोळे तपासणी मोफत करण्यात आली व ज्या कर्मचाऱ्यांना डोळ्याच्या चष्म्याचे नंबर लागलेले आहेत. अशा कर्मचाऱ्यांना माफक दरात चष्मे उपलब्ध करुन देण्यात आले. आश्रमशाळेमध्ये विद्यार्थी-विद्यार्थीनी निवासी असल्यामुळे त्यांच्या आरोग्याची काळजी चांगल्या पध्दतीने घेण्याकरीता वसतिगृतील कर्मचाऱ्यांचे आरोग्य सुस्थितीत असणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे या शिबीराचे आयोजन करण्यात आले. या आरोग्य शिबीराचे उद्घाटन अखील भारतीय फॅमिली प्लॅनिंग असोशिएशन ऑफ इंडियाचे सचिव प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, नेत्ररोग तज्ञ डॉ. राजीव प्रधान यांच्या शुभहस्ते व फॅमिली प्लॅनिंग असोशिएशन ऑफ इंडिया शाखेचे शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड यांच्या प्रुमख उपस्थितीत महात्मा ज्योतीराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांच्या प्रतिमेचे पुजन करुन करण्यात आले. आरोग्य शिबीराचे आयोजन इतर मागास बहुजन कल्याणचे सहायक संचालक श्रीम. मनिषा फुले, यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या आरोग्य शिबीराच्या उद्घाटना निरीक्षक एस. ए. कंदलगावकर, वरिष्ठ लिपीक श्रीम. मोनिका हिरेमठ, शिवाजी नाईक, श्री. म्हमाणे, श्री. दरेकरमुज्जमिल शेख, उदय शेलार, पराग चाबुकस्वार, नागेश जाधव, उल्हास जाधव, ओमनाथ चव्हाण, दिपक पवार, सौंदर्या खटके, श्री. सनके, श्री. कोकरे व श्री. गडपर हे उपस्थित होते.

फॅमिली प्लॅनिंग असोशिएशन ऑफ इंडिया शाखा, सोलापूर येथील श्री. श्रीकांत परदेशी, डॉ. योगेश पल्लेलु, डॉ.किर्तने, श्रीमती वांगीकर, श्रीमती. गडगडे, श्रीमती. कांबळे, श्री. आकाश आदी अधिकारी यांच्यासह डॉक्टर व कर्मचारी उपस्थित राहुन कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात मोलाचे सहकार्य केले. आरोग्य शिबीरामध्ये सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन श्री. दत्तात्रय बनसोडे सर यांनी केले.

# नळदुर्ग आपलं घर येथे अनाथ विद्यार्थ्यावर मायेचा आधार

## राजाभाऊ महाबोले यांच्या संकल्पनेतील अनाथ विद्यार्थांना साखरेचे हार वाटप



नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग शहर एक ऐतिहासिक शहर म्हणून खूप मोठ्या प्रमाणात चांगलीच ओळख आहे परंतु ३० सप्टेंबर १९९३ ला जेव्हा महाप्रलयकारी भूकंप झाला त्या भूकंपामध्ये अनेकांनी जीव गमविला त्या भुकंपात मयत झालेल्या कुटुंबातील विद्यार्थाना शिक्षणाचे धडे देण्यासाठी व अनाथ बालकांना मायेचा ओलावा टिकून राहण्यासाठी निराधाराचं आधार घर नळदुर्ग च्या बालाघाट डोंगराच्या कुशीत निर्माण झाले त्यानंतर नळदुर्ग या ठिकाणी आपलं घर नावाचं एक रोपट उभारलं गेलं त्या रोपट्याचे रूपांतर खूप मोठ्या वृक्षात दिसु लागले आहे त्याच रोपट्यातल्या निराधार व अनाथ मुलाना साखरेच्या हाराचे वाटप करून विद्यार्थ्यां मध्ये एक गोडवा निर्माण केले आहेत माजी नगरसेवक विनायक अंहकारी यानी विद्यार्थ्या बद्दल आपली भावना व्यक्त केली

त्याचाच भाग म्हणून येथील सामाजिक कार्यकर्ते राजाभाऊ महाबोले यांच्या संकल्पनेतील विद्यार्थ्यांसोबत गोडवा निर्माण करण्याचा प्रयत्न पाडव्या दिवशी गेला परंतु काही तांत्रिक अडचणींमुळे परत दोन दिवसांनी या अनाथांना मायेचा आधार देत विद्यार्थ्यांमध्ये गोडवा निर्माण केला शेकडो विद्यार्थ्यांना त्यांनी साखरेचे हार वाटप केले यावेळी नळदुर्ग नगरीचे माजी नगरसेवक विनायक अंहकारी , ज्येष्ठ पत्रकार विलास येडगे , माजी नगरसेवक महालिंग स्वामी , नळदुर्ग शहर पत्रकार संघटनेचे सचिव तानाजी जाधव , पत्रकार दादासाहेब बनसोडे , सामाजिक कार्यकर्ते संजय विठ्ठल जाधव यावेळी नाभिक संघटनेचे सर्व पदाधिकारी या ठिकाणी उपस्थित होते यामध्ये

राजाभाऊ महाबोले सुभाष महाबोले भगवानराव माने मयूर महाबोले संतोष महाबोले हणमंत हिलाल शुभम महाबोले यांच्या सह नागरीक उपस्थित होते .

## भाविकांच्या सुविधेसाठी आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना

# चैत्री वारीत भाविकांच्या आरोग्य सुरक्षितेला व स्वच्छतेला प्राधान्य : प्रांताधिकारी सचिन इथापे



पंढरपूर/प्रतिनिधीः चैत्री शुध्द एकादशी १९ एप्रिल रोजी असून, या चैत्री यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. या यात्रेत येणाऱ्या भाविकांची गैरसोय होणार नाही यासाठी प्रशासनाने व मंदीर समितीने आवश्यकती तयारी केली आहे. सध्या उन्हाळा सुरु असून, दिवसेंदिवस तापमानात वाढ होत आहे. यात्रेसाठी येणा-या भाविकांना उष्णतेचा त्रास होवू नये यासाठी भाविकांच्या आरोग्य सुरक्षितेला प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच भाविकांना आवश्यक सुविधा तात्काळ मिळाव्यात यासाठी पाच आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना करण्यात आली असून, हे कक्ष २४ तास कार्यरत राहणार असल्याची माहिती प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिली.चैत्री यात्रा तयारीबाबत प्रांत कार्यालय येथे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, तहसिलदार सचिन लंगुटे, नायब तहसिलदार मनोज श्रोत्री, पंढीत कोळी, उपमुख्याधिकारी सुनिल वाळुंजकर, मंदीर समितीचे व्यवस्थापक बालाजी पुदलवाड, तालुका आरोग्य अधिकारी अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, आरोग्य निरिक्षक शरद वाघमारे तसेच संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. चैत्री वारीत येणाऱ्या भाविकांना आवश्यक सोयी-सुविधा तात्काळ मिळाव्यात त्याचबरोबर आरोग्याच्या व स्वच्छतेच्या दृष्टीने कोणतेही गैरसोय येऊ नये यासाठी पत्राशेड, ६५ एकर, चंद्रभागा वाळवंट, विठ्ठल-रुक्मिणी मंदीर, नगरपालिका या पाच ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना केली आहे. आपत्ती व्यवस्थापन कक्षात नेमणूक केलेल्या अधिकारी व कर्मचारी यांनी आपली जबाबदारी चोखपणे पार पाडावी असे निर्देश प्रांताधिकारी इथापे यांनी दिले. आरोग्य विभागामार्फत यासाठी पत्राशेड, ६५ एकर, चंद्रभागा वाळवंट, दर्शन मंडप, पोलीस संकुल येथे प्रथमोपचार केंद्र उभारण्यात येणार आहेत. तसेच या ठिकाणी मुबलक प्रमाणात औषधसाठा उपलब्ध करण्यात येणार आहे. सर्व सुविधायुक्त रुग्णवाहिका सज्ज ठेवण्यात येणार आहे. तसेच नगरपरिषद व मंदीर समितीकडून दर्शन रांग, पत्राशेड, चंद्रभागा वाळवंट, ६५ एकर व मंदीर परिसर येथे वेळोवेळी स्वच्छता करण्यात येणार आहे. भाविकांच्या सुविधेसाठी दिशा दर्शक फलक, पार्किंग व्यवस्था, स्वच्छता गृहे आदी सुविधेबाबतचे दिशादर्शक फलक लावण्यात येणार आहेत. मंदीर समिती कडून दर्शन रांगेत स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, मॅट, कुलर, विश्रांती कक्ष, लाईव्ह दर्शन, वैद्यकीय सुविधा उपलब्ध असणार आहेत. ६५ एकर परिसरात मुबलक प्रमाणात पाणी व्यवस्था, अखंडीत व सुरक्षित विद्युत पुरवठा, अगिनशमन व्यवस्थेसह फिरते आरोग्य पथकांची नेमणूक करण्यात आली आहे.नदीपात्रात स्वच्छता व पुरेसा प्रकाश राहिल याची दक्षता घेवून, शहरात वाहतुक व्यवस्था सुरळीत रहावी, वाहतुकीस कोणतेही अडचण येवू नये यासाठी शहराबाहेर मोकळया जागेवर वाहन पार्किग व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच भाविकांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस प्रशासनाकडून आवश्यकतो बंदोबस्त तैनात करण्यात येणार असल्याचेही प्रांताधिकारी इथापे यांनी सांगितले.

# 8 True Naat मशीन चे उद्घाटन मनिषा आव्हाळे यांच्या हस्ते संपन्न

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर जिल्ह्यासाठी राज्य क्षयरोग विभागाकडून ८ ढ्रींश छरीं मशीन चे उद्घाटन मा. मनिषा आव्हाळे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर यांच्या हस्ते संपन्न सोलापूर जिल्हा परिषद येथे 8 TrueNaat मशीन चे उद्घाटन संशयित क्षयरुग्णांच्या थुंकी नमुने तपासणीसाठी सोलापूर जिल्ह्यासाठी राज्य क्षयरोग विभागाकडून ८ ढ्रींशछरीं मशीन प्राप्त झाले असून सदर ढ्रींशछरीं मशीनचे उद्घाटन मा.मनीषा आव्हाळे मॅडम मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.सोलापूर यांच्या हस्ते आज दिनांक १६/०४/२०२४ रोजी करण्यात आले. सदर उद्घाटन प्रसंगी मा.जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संतोष नवले,निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.श्रीकांत कुलकर्णी,जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.मिनाक्षी बनसोडे मॅडम आणि जिल्हा क्षयरोग केंद्रातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




सदर ढ्रींशछरीं मशीन आधुनिक जलद आण्विक तंत्रज्ञानाने बनविले असुन यामुळे क्षयरोगाचे तात्काळ व अचूक निदान केले जाते. तसेच या मशीन द्वारे औषधाला दाद न देणा-या (चऊढ) क्षयरुग्णाचेही निदान केले जाते. या माशीन द्वारे फक्त एक तासामध्ये क्षयरोगाचे अचूक निदान केले जाते. सध्या सोलापूर जिल्ह्यामध्ये ३ उइछ--ढ मशीन व ४ ढ्रींशछरीं उपलब्ध असून अत्ता नव्याने राज्यस्तरावरून ८ ढ्रींशछरीं मशीन मिळाल्यामुळे संपूर्ण जिल्ह्यातील सर्व तालुक्याच्या ठिकाणी या मशीनची उपलब्धता होणार आहे. या मशीन मुळे सर्वसामान्य रुग्णांना याचा लाभ होणार आहे. तसेच खाजगी वैद्यकीय व्यवसाय करणा-या डॉक्टर यांना ही त्यांच्याकडील संशयित क्षयरुग्णाच्या तपासणी साठी याचा लाभ होणार आहे. सदर तपासणी ही संपूर्णपणे मोफत असल्याने गरजू रुग्णांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन मा.मनीषा आव्हाळे मॅडम मुख्य कार्यकारी अधिकारी ,जि.प. सोलापूर यांनी या प्रसंगी केले.

# एन् एम् एम् एस् परीक्षेत श्री सरस्वती हायस्कूल टाकळीवाडी चे घवघवीत यश

पत्रकार नामदेव निर्मळे

श्री बाहुबली विद्यापीठाचे श्री सरस्वती हायस्कूल , टाकळीवाडी ता . शिरोळ जि कोल्हापूर . शैक्षणिक वर्ष २३ - २४ मध्ये इयत्ता आठवीसाठी शासनामार्फत घेण्यात येणाऱ्या एन् . एम्. एम् .एस् . परीक्षेत घवघवीत यश मिळाले. . या परीक्षेसाठी एकूण १५ विद्यार्थी बसले होते . त्यामधे १३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले . एकूण निकाल ८६.६६ % लागला . यातून दोन विद्यार्थिनी ४८००० रु . च्या शिष्यवृत्तीसाठी प्राप्त ठरल्या . त्यांची नावे खालील प्रमाणे १ ) गोरे समृध्दी संतोष २ ) निर्मळे दिपाली अजित या विद्यार्थिनींना विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. श्री संजय तपासे





, चेअरमन मा .श्री जितेंद्र कोथळी स्थानिक तसेच शालेय समितीचे सदस्य , आणि श्री एस.जे .चौगुले , श्री ए व्ही पाटील सौ एस ए पाटील,सौ. पी डी चौगुले तसेच श्री राजू जुगळे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. या सर्वांचे विद्यार्थी, विद्यार्थिनी, पालक ग्रामस्थ यांच्यामध्ये कौतुक होत आहे.

# कर्मवीर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मध्ये मोक एम एच टी-सीईटीचे उद्घाटन

पंढरपूर/ प्रतिनिधीःपहिल्या टेस्टसाठी विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद श्री पांडुरंग प्रतिष्ठान पंढरपूर संचालक कर्मवीर ऑफ टेक्नॉलॉजी महाविद्यालय मोफत मोक एम एच टी-सी इ टी च्या सराव परीक्षेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर एस पी पाटील यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी मुलांना प्रत्यक्ष कॉम्प्युटर सी ए टी परीक्षा कशी द्यावी याचे प्रात्यक्षिक देण्यात आले



यावेळी महाविद्यालयाचे प्रवेश प्रक्रिया प्रमुख डॉ अभय उत्पाद म्हणाले की बारावीच्या विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर ऑनलाईन परीक्षा देण्याचा सराव नसतो मुख्य परीक्षा वेळी विद्यार्थ्यांना मना त गोंधळ होऊ नये याची प्रॅक्टिस होण्याच्या उद्देशाने कर्मयोगी कॉलेजने या मोफत मॉक टेस्टच्या उपक्रम राबवला यामागे एकूण प्रॅक्टिस टेस्टचे आयोजन करण्यात आले असून येथून पुढील नऊ टेस्ट या ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येतील सदर परीक्षा त्यांची मुलांना व्हाट्सअप च्या द्वारे लिंक पाठवण्यात येईल व टेस्ट सोडवण्याच्या त्यांची उत्तरे त्यांना

. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सदर मोफत उपक्रमाचा लाभ घ्यावा असे त्यांनी यावेळी सांगितले की ऑनलाईन परीक्षा यशस्वी करण्यासाठी प्रा आर जे भोसले डी एस चौगुले यांचे विशेष मार्गदर्शन लाभले पांडुरंग प्रतिष्ठानचे चेअरमन रोहन परिचारक यांनी सदर उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस पी पाटील डॉक्टर ए बी कणसे ड्रॉ अभय उत्पात विभाग प्रमुख प्रा येती बाबर एस व्ही एकलारकर प्रा एस एम लंबे प्रा दीपक भोसले व प्रा अभिनंदन देशमाने व सर्व शिक्षक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते